



Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ७६५. वा | बुधवार | दि. ०८ मे २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# चौकशी समित्या बनल्या केवळ पांढरा हत्ती...

## जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाराची वारंवार चौकशी परंतु कारवाई मात्र शून्य

### करोडो रुपयांचा भ्रष्टाचार प्रकरणात एक निलंबन तर इतर दोषींवर कारवाई गुलदस्त्यात...

**पोस्टमार्टम ७९**

**करोडो रुपयांच्या भ्रष्टाचाऱ्यातील काही दोषी दुसऱ्या जिल्ह्यात बदली तर काही सेवानिवृत्त पण करोडो रुपये भ्रष्टाचार केलेल्यांकडून व्याजासह वसुलीच काय हा प्रश्न तक्रारकर्ते आरोग्य प्रशासनाला उपस्थित करीत आहे**

जनसंचलन/ बुलढाणा

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचारासंदर्भात आजवर विविध प्रकारच्या चौकशी समिती बनवण्यात आल्या. या समित्यांनी येथे येऊन चौकशी केली, परंतु या चौकशीतून आजवर काहीही निष्पन्न झालेले नाही. त्यामुळे वारंवार नियुक्त होणाऱ्या या चौकशी समित्या आता केवळ पांढरा हत्ती बनल्या की काय, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे. चौकशी समित्या केवळ चौकशी लांबवण्यासाठी आणि भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्यासाठीच बनत असल्याचा आरोप या प्रकरणी तक्रार करणारे सामाजिक कार्यकर्ते करू लागले आहेत. येथील जिल्हा रुग्णालयात गेल्या अनेक वर्षांमध्ये प्रचंड असा भ्रष्टाचार झालेला आहे. या भ्रष्टाचारात आतापर्यंत अनेक अधिकाऱ्यांनी आपले हात धुवून घेण्याचा प्रयत्न केला. अनेक अधिकाऱ्यांनी या भ्रष्टाचारातून अवैध चल अचल संपत्ती देखील आपल्या व नातेवाईकांच्या नावावर करून घेतल्य. हा भ्रष्टाचार राजरोसपणे सुरू होता, परंतु कारवाई कोणावरही होत नव्हती. भ्रष्टाचाराची माहिती ही खालपासून वरपर्यंत पोहोचली होती, मात्र, वारंवार वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून या भ्रष्टाचाराकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष करण्यात आले.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन ने सर्वप्रथम या भ्रष्टाचाराला वाचा फोडल्यानंतर मग शासन आणि प्रशासन खडबडून जागे झाले. यानंतर बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी या प्रकरणी एक लक्षवेधी थेट विधानसभेत उपस्थित केली. त्यांनी जिल्हा रुग्णालयात औषधी व साहित्य उपकरणांच्या खरेदीत ९९ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला. त्यानंतर भाजपचे नेते विनोद वाघ यांनीही या प्रकरणी तब्बल २०० कोटींचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला होता. अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनीही या भ्रष्टाचारासंबंधी अनेक प्रकारच्या तक्रारी केल्या होत्या. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनचा सातत्याने पाठपुरावा आणि विधानसभेत लागलेली लक्षवेधी यामुळे मुंबईपासून ते अकोल्यापर्यंत आरोग्य विभागाची झोप उडाली. त्यानंतर एक-दोनदा नव्हे तर तीन वेळा विविध प्रकारच्या चौकशी समिती या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी गठित करण्यात आल्या. या चौकशी समित्यांचे प्रतिनिधी बुलढाण्यात आले व त्यांनी या ठिकाणी अधिकाऱ्यांची चौकशी केली. काही कागदपत्रेही जप्त केली. यामध्ये अकोला उपसंचालक कार्यालयातील एक समिती या ठिकाणी चौकशी करून गेली, त्यानंतर पुण्याहून कुटुंबकल्याण आयुक्त कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे एक पथक या ठिकाणी चौकशी करून गेले. सर्वांत महत्वाची बाब म्हणजे या ठिकाणी चौकशी समिती येते, चौकशी समितीचे सदस्य काहीतरी माहिती घेतात, कागदपत्रे घेऊन जातात. पत्रकार जेंव्हा या संदर्भात चौकशी समितीतील अधिकाऱ्यांना विचारणा करतात, तेंव्हा त्यांना कसलीही माहिती दिली जात नाही. केवळ चौकशी सुरू आहे व लवकरच यासंदर्भातील अहवाल दिला जाईल, असे थातूरमातूर उत्तर दिले जाते. मात्र,एकदा चौकशी समिती येथून गेली की त्यानंतर त्या चौकशीचे काय झाले? त्याच्या अहवालाचे काय झाले? त्या अहवालात कोणाकोणावर ताशेरे ओढण्यात आले? अहवालात कोण-कोण थेट दोषी आहेत? दोषींवर कोणत्या कारवाईची शिफारस करण्यात आली? या कशाचीही माहिती ना पत्रकारांना मिळते ना सामान्य जनतेला. याचाच अर्थ स्पष्ट आहे की, या चौकशी समित्या केवळ चौकशी आणि कारवाई रेंगाळण्यासाठी बनवल्या जातात. कारण कोणाही भ्रष्टाचारी अधिकाऱ्यावर यासंदर्भात कोणतीही कारवाई होत नाही. यावरून चौकशी समित्यादेखील या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी मॅनेज केल्या की काय, असा प्रश्न तक्रारकर्ते उपस्थित करू लागले आहेत. यासंदर्भात दोन दिवसांपूर्वी अकोल्याचे आरोग्य उपसंचालक भंडारे यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी कानावर हात ठेवले आणि आता राज्यस्तरीय चौकशी समितीच आपला अंतिम अहवाल देईल व त्यावरच तेच काय तो निर्णय घेतील, असे उडवाउडवीचे उत्तर दिले. कारण खुद्द अकोला उपसंचालक कार्यालयाच्या पथकाने




देखील या भ्रष्टाचाराची चौकशी केली, त्यात नेमके काय तथ्य आढळले, हे तर भंडारे साहेब सांगू शकले असते. मात्र, त्यांनी हे सांगण्यास पूर्णपणे टाळाटाळ केली. यावरून स्पष्ट आहे की, आरोग्य खात्यातील वरिष्ठ अधिकारी हे भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न करीत आहेत. खरे तर हा घोटाळा शेकडो कोटींचा आहे, त्यामुळे या घोटाळ्यातील आरोपी हे चांगलेच गबर झाले आहेत. त्यांनी या चौकशी समित्यांचे अहवाल नसत्या खटपटी करून आजवर उघड होऊ दिलेले नसण्याची दाट शक्यता आहे. परंतु आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी देखील जी अक्षम्य टाळाटाळ करीत आहेत, ती बाब खूपच गंभीर आहे. अशाने आरोग्य विभागातील हा भ्रष्टाचार कधीच चव्हाट्यावर येणार नाही व भ्रष्टाचारी हे राजरोसपणे भ्रष्टाचार करीत राहली. आरोग्य विभागाचे अधिकारी भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करण्यास टाळाटाळ करीत असले, तरी मात्र दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज याकडे कधीही दुर्लक्ष होऊ देणार नाही. भ्रष्टाचाऱ्यांविरोधात कणखरपणे दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने लढत राहणार, यात काही शंका नाही.


अजून बरेच काही पुढील भागात...


# मालवाहू वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार तर एक गंभीर जखमी

जनसंचलन/ देऊळगाव राजा

भरधाव मालवाहू वाहनाने दुचाकी स्वरास धडक दिल्याने तो जागीच ठार झाला ही घटना चिखली जालना राष्ट्रीय महामार्गावरील एका हॉटेल समोर ६ मे रोजी घडली आहे. गणेश बबनराव शिंगाडे वय ३० रा डोंगरगाव ता बदनापूर जी जालना असे मृताचे नाव आहे चिखली कडून देऊळगाव मही येणाऱ्या मालवाहू टेम्पोने क्रमांक एम एच २८ बीबी ४६३९ जालना कडून चिखली कडे जाणाऱ्या दुचाकीला समोरासमोर धडक दिली या अपघातात दुचाकी स्वार गणेश बबनराव शिंगाडे हा जागीच ठार झाला तर दुचाकीच्या पाठीमागे बसलेले गणेश रामराव बनसोडे हा गंभीर जखमी झाला आहे त्याची प्रकृती चिंताजनक असल्यामुळे त्याला जालना येथे रेफर करण्यात आले आहे प्राप्त माहितीनुसार मृतक गणेश शिंगाडे व गणेश बनसोडे हे दोघेजण डोंगरगाव वरून खेरव अंबाशी येथे सासऱ्याच्या दशक्रिया विधीच्या कार्यक्रमासाठी जात असताना रस्त्यातच त्यांच्यावर काळाने धडक घातली या अपघाताची माहिती लहान भाऊ सुरेश बबनराव शिंगाडे व आई यांना मिळताच त्यांनी जळगाव मही ग्रामीण रुग्णालय गाठले व त्या ठिकाणी एकच टाहो फोडला या अपघाताची माहिती मिळताच पोलीस हेडकॉन्स्टेबल कलीम देशमुख, गीते यांनी घटनास्थळी पोहोचून मालवाहू टेम्पोला ताब्यात घेतले असून वाहन चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास देऊळगावराजा पोलीस करीत आहे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# १ जून पासून पशुधनास बिल्ला (बारा अंकी टॅग) बंधनकारक

जनसंचलन/ खामगाव

सर्व गायवर्ग, म्हैसवर्ग शेळी व मेंढी इतर पशुधनास बिल्ला मारून घेणे (टॅगिंग) बंधनकारक करण्यात आले असून येत्या १ जून २०२४ पासून त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. कानातील बिल्याशिवाय पशुधनाची खरेदी-विक्री करता येणार नाही.त्यामुळे पशुपालकांना पशुधनास कानात बिल्ला मारून घेणे बंधनकारक झाले आहे. सर्व शेतकरी, पशुपालक बांधव यांच्याकडे असलेल्या प्रत्येक लहान-मोठ्या पशुधनास कानात बिल्ला असणे आता शासनाने बंधनकारक केलेले आहे. कानातील बिल्ल्याशिवाय पशुधनास पशुवैद्यकीय दवाखान्यामधून पशुवैद्यकीय सेवा देय होणार नाहीत.नैसर्गिक आपत्ती,विजेचा धक्का तसेच वन्यपशुंच्या हल्ल्यामुळे मृत्युमुखी पडलेल्या पशुधनास कानाला बिल्ला नसल्यास नुकसान भरपाईची रक्कम देय होणार नाही.कानात बिल्ला नसलेल्या पशुधनाची बाजार समिती, आठवडी बाजार व गावागावांतील खरेदी विक्री करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.त्यामुळे कानात बिल्ला नसलेले पशुधन बाजार समितीमध्ये आणले जाणार नाहीत व त्यांची खरेदी विक्री होणार नाही याची दक्षता संबंधित बाजार समितीद्वारे घेण्यात येईल. पशुधनाची वाहतूक कानात बिल्ला असल्याशिवाय करता येणार नाही.तसे केल्यास पशुधनाचे मालक व वाहतूकदार यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.पशुधनाच्या मालकी हस्तांतरण बाबतच्या नोंदी संबंधित पशुवैद्यकीय अधिकाऱ्याकडून त्वरित अद्यावत करून घेण्याची जबाबदारी संबंधित पशुपालकाची राहील. ग्रामपंचायत मध्ये पशुंच्या विक्री किंवा परिवर्तनाचा दाखला देताना पशुधनाची इअर टॅगिंग झाल्याशिवाय तो देण्यात येऊ नये.दाखल्यावर कानातील बिल्ला क्रमांक नमूद करण्यात यावा. जाणीवपूर्वक नष्ट केलेल्या पशुधनाची नोंद भारत पशुधन प्रणालीवर नसल्यास केंद्र व राज्य शासनाकडून देय असलेले आर्थिक सहाय्य देय होणार नाही. नैसर्गिक आपती, विजेचा धक्का तसेच वन्य पशुंच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पशुधनास कानात बिल्ला मारलेला नसल्यास नुकसान भरपाई रक्कम देय होणार नाही. त्यामुळे सर्व पशुपालकांनी पशुधनाच्या कानात बिल्ला मारून घ्यावा,व सर्व पशुधनाची नोंद भारत पशुधन प्रणालीवर घेण्यास सहकार्य करावे असे आवाहन पशुधन विकास अधिकारी डॉ.आर.बी. सोनोने पंचायत समिती,खामगांव यांच्या मार्फत करण्यात आले आहे.

# मलकापूर मतदारसंघात मतदानासाठी प्रतिबंधात्मक आदेश लागू

जनसंचलन/बुलडाणा

बुलडाणा जिल्ह्यातील मलकापूर विधानसभा मतदारसंघाचा समावेश रावेर लोकसभा मतदारसंघात असल्याने या मतदारसंघाच्या मतदानासाठी मलकापूर मतदारसंघात प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. भारत निवडणूक आयोगाने सार्वत्रिक लोकसभा निवडणूक-२०२४ ची घोषणा केली आहे. त्यानुसार दि. १६ मार्च ते ६ जून २०२४ पर्यंत राज्यात आदर्श आचार संहिता लागू झाली आहे. जिल्ह्यातील सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राहणे आवश्यक असल्याने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक निर्भय व निपक्षपातीपणे पार पाडण्याच्या दृष्टीने राजकीय नेते आणि कार्यकर्ते यांनी मतदानाचा निश्चित केलेल्या दिनांकाच्या ४८ तासाच्या अगोदर सदर मतदारसंघ सोडून जाणे आवश्यक आहे. तसेच अशा व्यक्तींनी कोणत्याही प्रकारच्या राजकीय सभा घेऊ नये. त्यानुसार मुंबई पोलिस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१) नुसार जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जिल्ह्यातील सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था अबाधित राहणे आवश्यक असल्याने, दि. १३ मे २०२४ रोजी रावेर लोकसभा मतदारसंघातील मलकापूर विधानसभा मतदारसंघात मतदान होणार असल्याने कायदा व सुव्यवस्था कायम राहण्याच्या दृष्टीने तसेच लोकसभा निवडणूक निर्भय व निपक्षपातीपणे पार पाडण्याच्या दृष्टीने मतदनाचा दिनांक व मतदान संपण्याच्या ४८ तास अगोदर म्हणजे दि. ११ मे २०२४ रोजी सायंकाळी ६ वाजेनंतर कोणत्याही प्रकारच्या राजकीय सभा घेऊ नये, असे आदेश दिले आहे. तसेच राजकीय नेते, कार्यकर्ते सदर मतदारसंघाचे मतदार नसतील अशा व्यक्तींनी मतदानाच्या निश्चित केलेल्या दिनांकाच्या ४८ तासाच्या अगोदर सदर मतदारसंघ सोडून जाण्याचे आदेश देण्यात आले आहे. सदर बंदी आदेश मलकापूर विधानसभा मतदारसंघात दि. ११ मे २०२४ रोजीचे सकाळी ६ वाजल्यापासून ते दि. १३ मे २०२४ चे रात्री २२ वाजेपर्यंत लागू राहील. सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती मुंबई पोलिस अधिनियम, १९५१ चे कलम १३५ व भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ नुसार कार्यवाहीस पात्र राहणार आहे, असे जिल्हादंडाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी कळविले आहे.

# किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी बीजप्रक्रिया करावी कृषि विभागाचे आवाहन

जनसंचलन/बुलडाणा

बियाणे जमिनीत पेरण्यापूर्वी जमिनीतून किंवा बियाण्यातून पसरणारे विविध रोग आणि किडींचा प्रादुर्भाव टाळणे, तसेच बियाण्यांची उगवण क्षमता वाढविण्यासाठी आणि रोपे सतेज आणि जोमदार वाढविण्यासाठी बियाण्यावर वेगवेगळी जैविक व रासायनिक औषधांची प्रक्रिया म्हणजेच बीजप्रक्रिया करावी, असे आवाहन कृषि विभागाने केले आहे. बीज प्रक्रिया केल्यास जमीन आणि बियाण्या द्वारे पसरणाऱ्या रोगांचा प्रादुर्भाव टाळता येतो. बियाण्याची उगवणक्षमता वाढते. रोपे सतेज व जोमदारपणे वाढतात. पिकाच्या उत्पादनात वाढ होते. बीजप्रक्रियेसाठी कमी खर्च येतो, त्यामुळे ही कीडरोग नियंत्रणाची किफायतशीर पद्धत आहे. जिवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया ही नत्र स्थिरीकरणासाठी सोयाबीन गटाचे रायझोबिअम २५० ग्रॅम आणि स्फुरद विरघळवणारे जिवाणू २५० ग्रॅम या जिवाणू संवर्धकाचे पाकिट प्रति १० किलो सोयाबीन बियाण्यास वापरावे. १ लिटर गरम पाण्यात १२५ ग्रॅम गूळ टाकून द्रावण तयार करावे. सोयाबीन बियाणे ओलसर करून घ्यावे. द्रावण थंड झाल्यावर त्यामध्ये २५० ग्रॅम जिवाणू संवर्धक टाकून बियाण्यास हळुवारपणे लावावे किंवा जिवाणू संवर्धकाचा लेप बियाण्यावर समप्रमाणात बसेल व बियाण्यांचा पृष्ठभाग खराब होणार नाही, याची काळजी घ्यावी. नंतर बियाणे सावलीत स्वच्छ कागदावर सुकवावे. अशा बीजप्रक्रिया केलेल्या बियाण्याची पेरणी ताबडतोब करावी. याचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होत नाही.




जमिनीतील सेंद्रीय पदार्थ कुजवून जमीन सुधारण्यास मदत होते. जिवाणू संवर्धक बीजप्रक्रिया करताना जिवाणू संवर्धकाची प्रक्रिया ही बुरशीनाशके किंवा किटकनाशकांची प्रक्रिया केल्यानंतर करण्यात यावी. जिवाणू संवर्धक लावण्यापूर्वी बियाण्यास किटकनाशके, बुरशीनाशके, जंतुनाशके लावलेले असतील तर जिवाणू संवर्धक नेहमीपेक्षा दीडपट जास्त प्रमाणात लावण्याची दक्षता घ्यावी. जैविक बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करताना सोयाबीन पिकावरील अनेक प्रकारच्या बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण करण्यासाठी प्रति किलो बियाण्यास ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा वापरावे. ट्रायकोडर्मा ही एक प्रकारची बुरशी असून ती पिकांना हानीकारक नसते. उलटपक्षी बियाण्यांवर रोग पसरविणाऱ्या बुरशींची वाढ न होऊ देता जमिनीमध्ये रोगकारक बुरशींचा नायनाट करून पिकांचे संरक्षण करते. ट्रायकोडर्मा बीजप्रक्रिया करताना बियाणे स्वच्छ फरशी, प्लास्टिक किंवा ताडपत्रीवर पातळ धरात पसरवून ट्रायकोडर्मा ओलसर करून शिंपडावे नंतर हलक्या हाताने बियाण्यास चोळावे. प्रक्रिया केलेले बियाणे अर्धा तास सावलीत सुकवून पेरणी करावी. ट्रायकोडर्मा बीज प्रक्रियेबाबत ट्रायकोडर्माचा वापर रासायनिक खतासोबत किंवा रासायनिक बुरशीनाशकांचा सोबत शक्यतो करू नये. ट्रायकोडर्मा सूर्यप्रकाशापासून दूर, कोरड्या व थंड जागेत साठवावे. बीजप्रक्रिया करतेवेळी सिडड्रमचा वापर करावा, जेणेकरून बियाण्याला बीजप्रक्रियेकरिता वापरण्यात येणारे जीवाणू संवर्धक समप्रमाणात बियांना लागतील याची दक्षता घ्यावी. सिडड्रमविषयी अधिक माहितीकरीता तालुका कृषि अधिकारी कार्यालयास संपर्क साधावा. शेतकऱ्यांनी पेरणी करते वेळेस यंदाच्या खरीप हंगामात ट्रॅक्टरचलीत बीबीएफ पेरणी करणे किंवा बैलजोडीद्वारे सरीवरंबा काढून टोकन पद्धतीने सोयाबीन पेरणी करावी. विविध कंपन्यांकडून खरेदी करण्यात येत असलेले सोयाबीन बियाणे बोगस निघून मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे शेतकऱ्यांनी यंदाच्या हंगामात शास्त्रशुद्ध पद्धतीने घरच्या बियाण्याची उगवण क्षमता तपासून आणि बीजप्रक्रिया करून बियाणे पेरणीसाठी वापरावेत, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

# मॉडेल डिग्री कॉलेज येथे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासंदर्भात कार्यशाळा संपन्न

जनसंचलन/बुलडाणा



नॅशनल एज्युकेशन पॉलिसी अनिवार्य असून शंभर टक्के लागू होणार आहे. तरुणांना संपत्ती म्हणून तयार करण्यासाठी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आवश्यक असून पुढील काळ शिक्षकांसाठी देखील महत्वपूर्ण आहे. राष्ट्रीय नैतिक कर्तव्य म्हणून याकडे बघा आणि विद्यार्थ्यासाठी आदर्श मॉडेल तयार करा,असे प्रतिपादन प्रा. सुबोध चिचोले यांनी केले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या बुलढाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेज येथे आज ७ मे रोजी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण संदर्भात एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी मार्गदर्शन करताना प्रा सुबोध चिचोले बोलत होते या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थांनी मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक अण्णासाहेब म्हळसणे हे होते यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. सुबोध चिंचोले म्हणाले की बारावीनंतर ४० टक्के विद्यार्थी उच्च शिक्षणात येतात. उर्वरित पदवी, अन्य अभ्यासक्रमास प्रवेश घेतात. पारंपरिक अभ्यासक्रमाबाबत अनास्था असल्याने काही विद्यार्थी प्रवेश घेत नसतील. उच्च शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या अशा विद्यार्थ्यांना शिक्षणाची रचना बदलली आहे . या अभ्यासक्रमांना प्रवेश घेतल्यास आता कौशल्य, आवडीचे शिक्षण, मेजर- मायनर, ऑन जॉब ट्रेनिंग, विषय निवडीचे स्वातंत्र्य मिळणार आहे. एनईपीत रोजगाराभिमुख शिक्षण मिळणार असून विद्यार्थ्यांना हे सांगणे गरजेचे आहे असे ते म्हणाले २०२४-२५ या शैक्षणिक क्षेत्रापासून पदवी अभ्यासक्रमांना एनईपी लागू होईल . त्यामुळे अशा अभिमुकता कार्यशाळांची गरज असल्याचे मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक अण्णासाहेब म्हळसणे त्यांनी व्यक्त केली. या कार्यशाळेचे प्रास्ताविक प्रा. देशमुख यांनी तर आभार प्रदर्शन प्रा वाय टी वाघ यांनी केले या कार्यशाळेला मॉडेल कॉलेजमधील प्राध्यापक प्राध्यापिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# प्रत्येक मतदान केंद्रातील व्हिडिओ रेकॉर्डिंग जतन करून ठेवा रविकांत तुपकर यांची निवडणूक आयोगाकडे मागणी...

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा लोकसभा मतदारसंघाची निवडणूक प्रक्रिया पार पडली असून यासाठी २६ एप्रिल रोजी मतदान झाले. मतदानाच्या वेळी सर्व मतदान कक्षांमध्ये व्हिडिओ रेकॉर्डिंग करावे, असे निर्देश मा. सर्वोच्च न्यायालयाने दिले होते, मतदान प्रक्रियेचे झालेले व्हिडिओ रेकॉर्डिंग हा मतदान प्रक्रियेची वैधता ठरवणारा एकमेव पुरावा आहे, त्यामुळे प्रत्येक मतदान केंद्रातील व्हिडिओ रेकॉर्डिंग जतन करून ठेवावे, अशी मागणी रविकांत तुपकर यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे. लोकसभा निवडणुकीचे अपक्ष उमेदवार रविकांत तुपकर यांनी या संदर्भातील निवेदन जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांच्यामार्फत निवडणूक आयोगाकडे पाठविले आहे. या निवेदनात नमूद आहे की, मी स्वतः अपक्ष म्हणून पाना या चिन्हावर लोकसभेची निवडणूक लढविली आहे. २६ एप्रिल २०२४ रोजी मतदान पार पडले आहे. मतदानाच्या मतदान कक्षामध्ये मतदान निपक्षपातीपणे, मोकळ्या वातावरणात व कायदेशीरपणे पार पडते आहे किंवा नाही हे तपासून पाहण्यासाठी सर्व मतदान कक्षांमध्ये मतदानाच्या व्हिडिओ रेकॉर्डिंग करावे, असे निर्देश माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आहेत. बुलढाणा लोकसभा मतदारसंघा करिता २६ एप्रिल २०२४ रोजी मतदान झाले. सायंकाळी पाच वाजेपर्यंत मतदानाची सरासरी ही ५० ते ५५ टक्के पर्यंत होती. मात्र अखेरच्या एका तासामध्ये मतदानाच्या टक्केवारी मध्ये आकस्मिकपणे दहा टक्क्यांची वाढ झालेली आहे. सदर मतदान हे रात्री उशिरापर्यंत चालल्याचे कळते. त्यामुळे सर्व मतदान केंद्रावरील अखेरचे मतदान होऊन मतपेट्या सीलबंद करेपर्यंतचे व्हिडिओ रेकॉर्डिंग अत्यंत महत्त्वाचे आहे. झालेले मतदान हे योग्य प्रकारे झालेले आहे किंवा नाही हे पाण्यासाठी सर्व मतदान केंद्रांमध्ये झालेले व्हिडिओ रेकॉर्डिंग अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. सदर व्हिडिओ रेकॉर्डिंग हे मतदानाची वैधता सिद्ध करणारा एकमेव पुरावा आहे त्यामुळे, बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील सर्व मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रियेचे करण्यात आलेले व्हिडिओ रेकॉर्डिंग जतन करून ठेवावे, अशी मागणी रविकांत तुपकर यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे.

# चंदनाचे झाड तोडून खोड केले लंपास

**जनसंचलन/बुलढाणा**




शहरातील मोठ्या अधिकाऱ्यांनंतर आता न्यायाधीशांच्या निवासस्थानातील चंदनाचे झाड तोडून त्यातील गाभा अज्ञात चोरट्याने लंपास केल्याचे समोर आले असून ६ मे रोजी याप्रकरणी बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ५ मे रोजी ही घटना समोर आली चंदन चोरट्यांनी आता चांगलीच हिम्मत वाढली असून चंदन चोरांनी विष्णूवाडी येथील न्यायाधीशांच्या बंगल्याच्या आवारातील एक चंदनाचे झाड कापून त्यातील गाभा लंपास केला याप्रकरणी शिपाई अमोल दत्तू काळवाघे यांनी बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली त्यानुसार पाच मे रोजी ते सकाळी विष्णूवाडी येथील न्यायाधीशांच्या निवासस्थानी कर्तव्यावर गेले होते. साफसफाई करत असताना बंगल्याच्या वॉल कंपाऊंड मध्ये असलेले चंदनाचे झाड त्यांना तुटलेले दिसले अज्ञात चोट्यांनी झाडाला कटरच्या साह्याने कापून त्याचे खोड चोरून नेले याची माहिती त्यांनी न्यायाधीशांना ही दिली त्यानंतर या प्रकरणात बुलढाणा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास बुलढाणा शहर पोलीस करत आहे

# डीजे बेंड संघटना कडून न्याय न मिळाल्यास निवडणुकीवर टाकणार बहिष्कार



**जनसंचलन/मलकापूर**

आज दिनांक ७ मे रोजी मलकापूर, नांदुरा , जलगाव येथील डिजे सघटणाने मलकापूर येथील पोलिस स्टेशन ला दिलेल्या निवेदनात नमूद आम्ही व्यवसायाने डिजे जॉकी (गाणे वाजविणे) करणारे असून सदर डिजे जॉकी साठी लागणारे सांऊड काहींनी शेतीवर, घरावर कर्ज काढुन घेतलेले आहे. तर काहींनी बँकेचे कर्ज काढुन घेतलेले आहे. तर काहींनी सदर साऊंड हा व्याजाने पैसे घेवून विकत घेतलेले आहे. साऊंड विकत घेतलेले असल्यामुळे आमच्यावर भरपूर कर्ज झालेले आहे. व त्याचे हप्ते भरणे बाकी आहे. सदर आमच्या व्यवसायावर प्रत्येक डिस्क जॉकीवर प्रत्येक पाच ते सहा माणसे व त्यांच्या फॅमीली मेंबर व परिवार अवलंबून आहे. परंतू मलकापूर व नांदुरा तालुक्यामध्ये पोलीस स्टेशन हे सदर डिस्क जॉकी वाजविण्यासाठी कोणतेही कारण नसतांना मनाई केली आहे. व सदर डिस्क जॉकी वाजविण्यासाठी कायदेशिर परवानगी सुध्दा देत नाही. त्यामुळे आमच्या व्यावसायावर अवलंबुन असलेले आमचे संपुर्ण कुटूंब यावर आमच्या व्यवसाय हा बंद केल्यामुळे उपासमारीची वेळ आलेली आहे. आम्ही व्यवसायासाठी घेतलेले कर्ज व त्याचे हप्ते फेडण्यासाठी पैसे नसल्यामुळे आमच्यावर कर्जाच्या हप्ते चे बोजे वाढत आहे. त्यामुळे आमच्या व कुटूंबावर आर्थिक ताण येवून आमचे व आमच्या कुटुंबाचे जगणे कठीन झाले आहे. यातुन आपल्या जिल्हयात व बाहेरील जिल्हयामध्ये सुध्दा व्यवसाय चालु करण्याबाबत परवानगी दयावी. अन्यथा आम्ही व आमच्या व्यवसायावर अवलंबुन असलेले सर्व कामगार त्यांची कुटूंबे हे या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीवर बहीष्कार टाकु करीता हे निवेदन देत आहे. अन्यथा आम्ही आमच्या परीवारासह लोकशाही मागनि उपोषणाला बसु. तसेच बुलढाणा पोलिस अधीक्षक यांनी सहा लाखाच्या जवळपास दंड स्वरूपात शिक्षा ठोठावली आहे ते पैसे भरण्याची आमची परिस्थिती नाही त्यामुळे तो दंड आम्ही भरण्यास असमर्थ आहे म्हणून शासकीय नियमा अती शर्ती नुसार आम्ही आमचा व्यवसाय करू आम्हाला व्यवसाय करण्याची परवानगी द्यावी अशी माहिती आहे

# जळगाव जामोद येथील लाचखोर वनपाल गजाआड!

## दहा हजाराची लाच स्वीकारताना एसीबीने पकडले रंगेहाथ..

**जनसंचलन/ जळगाव जामोद**




वन गुन्हा दाखल असलेला व्यक्ती आरोपी म्हणून सिद्ध न व्हावा, यासाठी वनपरिक्षेत्र अधिकारी जळगाव जामोद येथील वनपालाने दहा हजारांची लाच स्वीकारल्याची खळबळजनक बातमी समोर आली आहे. यासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला माहिती मिळाताच काल, ६ एप्रिलला सापळा रचून कारवाई करण्यात आली, दरम्यान वनपाल शेख कलीम शेख बिबन (४८ वर्ष) याला लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. त्याच्यावर जळगाव जामोद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. वनपरीक्षेत्र अधिकारी कार्यालय जळगाव जामोद येथे वन विभागाच्या सालई गोंद अवैधरित्या जमा केल्याबाबत एका जणावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. परंतु या गुन्ह्यात दाखल झालेला व्यक्ती आरोपी सिद्ध न व्हावा यासाठी वनपाल शेख कलीम शेख बिबन याने दहा हजारांची मागणी केली. याबाबत लाच लुचपत प्रतिबंधक विभाग बुलढाणा यांना गुप्त माहिती मिळाली. त्यांनतर काल ६ मे रोजी , जळगाव जामोद येथील वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयात सापळा रचण्यात आला. त्यावेळी वनपाल शेख कलीम याला दहा हजारांची लाच स्वीकारताना एसीबीने रंगेहाथ पकडले. सदर कारवाई, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती परिक्षेत्र पोलीस अधीक्षक मारुती जगताप, अनिल पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक (एसीबी बुलढाणा) श्रीमती शितल घोगरे , निरीक्षक सचिन इंगळे, सहाय्यक फौजदार श्याम भांगे, हवालदार प्रवीण बैरागी, हवालदार विनोद लोखंडे, जगदीश पवार, रंजीत व्यवहारे, चालक हवालदार नितीन शेटे, हर्षद शेख यांनी पार पाडली.

# पतीला गुंगारा देत विवाहितेने केले पलायन...

**जनसंचलन/ शेगाव**




कोणत्या क्षणी कधी काय होईल यांचा आता काही नेम राहिला नाही. कधी विचार न करणारी घटना समोर येते आणि चक्क राहतो.कामानिमित्त आलेले पती-पत्नी एका झाडाखाली थांबले असता पत्नीने पतीच्या चेहऱ्यावर बॉडी स्प्रे मारून त्याला गुंगारा देत पलायन केले आहे ही घटना ४ मे रोजी दुपारी शेगाव ते बाळापूर रोडवरील पंपाजवळ घडली आहे. याबाबत मेहकर तालुक्यातील एका गावातील व्यक्तीने शेगाव शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली त्यामध्ये पत्नी व तो शेगाव मध्ये आले होते त्यावेळी पत्नीने ऊन जास्त आहे झाडाखाली थांबू असे म्हटल्याने दोघेही झाडाखाली गेले तेथे संबंधित व्यक्तीच्या पत्नीने त्याच्या डोळ्यावर बॉडी स्प्रे मारून पालायन केले संबंधित महिला निमगोऱ्या रंगाची आहे पाच फूट उंची असून सडपातळ बांधा असल्याची त्याने तक्रारीत म्हटले आहे

# हरियाणात राजकीय भूकंप लोकसभा निवडणुकीच्या गडबडीत भाजपचा गेम नाराज आमदारांनी सरकारचा पाठिंबा काढून घेतला

**वृत्तसंस्था/चंदीगड**

चंदीगड: देशात लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याचे मतदान सुरू असताना हरियाणा राज्यात मोठा राजकीय भूकंप झाला. राज्यातील नायब सैनी सरकारला पाठिंबा देणाऱ्या तिघा अपक्ष उमेदवारांनी नाराज होत पाठिंबा काढून घेतला. इतक नाही तर या सर्व आमदारांनी काँग्रेसला पाठिंबा देत असल्याचे जाहीर केले. राज्यातील या ३ आमदारांनी पत्रकार परिषद घेऊन सरकारचा पाठिंबा काढून घेत असल्याचे जाहीर केले. धक्कादायक म्हणजे हे सर्व अशा वेळी झाले आहे जेव्हा राज्यातील नेतृत्वात बदल होऊन फक्त २ महिने झाले.राज्यातील नायब सैनी सरकारचा ज्या अपक्ष आमदारांनी पाठिंबा काढून घेतला आहे त्यामध्ये पुंडरीचे आमदार रणधीर गोलन, नीलोखेडीचे आमदार धर्मपाल गोंदर, चरखी दादरीचे आमदार सोमवीर सांगवान यांचा समावेश आहे. रोहतक येथे या तिघा आमदारांनी काँग्रेसचे प्रदेश प्रमुख उदयभान यांच्या उपस्थितीत भाजप सरकारचा पाठिंबा काढून घेत असल्याचे सांगितले. राज्यातील ४ अपक्ष आमदारांनी लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा प्रचार करणार असल्याचे जाहीर केले होते.नायब सैनी सरकारने आवाजी विश्वासदर्शक प्रस्ताव जिंकला होता. २०१९च्या निवडणुकीत ९० सदस्य असलेल्या विधानसभेत भाजपने ४० जागा जिंकल्या होत्या. काँग्रेसने ३१ तर १० जागांवर जेजेपीने विजय मिळवला होता. ७ जागांवर अपक्ष उमेदवार विजयी झाले होते. एक जागा हरियाणा लोकहित पार्टीतर एक जागा इनेलोला मिळाली होती. सध्या विधानसभेत २ जागा रिक्त आहेत. यात करनाल आणि रानिया मतदारसंघांचा समावेश आहे. अशा स्थितीत विधानसभेतील सध्याची सदस्य संख्या ८८ इतकी आहे.लोकसभा निवडणूक २०२४मध्ये हरियाणात सहाव्या टप्प्यात मतदान होणार आहे. राज्यात भाजप १०, काँग्रेस ९ आणि आम आदमी पक्ष १ जागेवर निवडणूक लढवत आहे. राज्यातील आणखी एक आमदार राकेश दौलदाबाद यांनी देखील



काँग्रेससाठी प्रचार करणार असल्याची घोषणा केली आहे. ते दौलदाबाद गुरुग्रामच्या बादशाहपूरचे आमदार आहेत. राकेश यांनी २०१९ मध्ये भाजपच्या मनीष यादव यांचा पराभव केला होता.

# खतांची दरवाढ झाल्यास वन बुलढाणा मिशन छेडणार आंदोलन!

**जनसंचलन/बुलढाणा**



आगामी खरीप हंगामाकरिता जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मुबलक खते व बियाणे उपलब्ध करण्यासह रासायनिक खतांची दरवाढ रोखण्यात यावी. अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा वन बुलढाणा मिशनच्यावतीने देण्यात आला आहे. याबाबत ६ मे रोजी जिल्ह्यातील कृषी अधिकाऱ्यांना एकाच वेळी निवेदन देण्यात आले. खरीप हंगाम महिन्याभरावर येऊन ठेपला आहे. तत्पूर्वी प्रशासनाने खरीपपूर्व बैठका व नियोजन करणे गरजेचे आहे. म्हणजे ऐनवेळी धावपळ आणि गैरसोय होणार नाही. शेतकऱ्यांना वेळेवर दर्जेदार व मुबलक खते, बियाणे उपलब्ध झाली पाहिजेत. तसेच खतांच्या किंमती वाढवण्याऐवजी रास्त दरात शेतकऱ्यांना खते मिळायला हवीत. सध्या रासायनिक खतांच्या किंमती भरमसाठ वाढलेल्या आहेत. तर दुसरीकडे मालाचे भाव जैसे थे आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना शेती करणे व खत विकत घेणे परवडत नाही. सरकारने खत दरवाढीचा पुनर्विचार करावा. दरवर्षी आपण पाहतो की, खतांचा तुटवडा जाणवतो. कुठे बोगस बियाण्याविरोधात आवई उठते. अशी परिस्थिती उदभवण्याआधीच खबरदारी घेतल्यास सोयीचे होईल. ऐन पेरणीच्या तोंडावर शेतकरी बांधवांची आर्थिक व मानसिक लुट झाल्याचा मागील वर्षीचा अनुभव आहे. मोठ्या संकटाचा सामना शेतकऱ्यांना करावा लागला होता. यावर्षी त्याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून उपाययोजना आखण्याची गरज आहे. गतवर्षी नफेखोर व्यापाऱ्यांनी बोगस बियाणे वापरून अनेक शेतकऱ्यांची लुट केली होती. त्यामुळे दुबार पेरणीची वेळ आमच्या शेतकरी बांधवांवर आली होती. यावर्षी तशी परिस्थिती निर्माण होऊ नये. तसेच रासायनिक खतांच्या किंमतीमध्ये वाढ करु नये. गतवर्षीच्या किंमतीतच शेतकऱ्यांना खते उपलब्ध करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांना निवेदन देतांना दत्तात्रय नारायण सावळे, कैलास भीमराव इंगळे, ज्ञानेश्वर विनायक पाटील , दिलीपराव साहेबराव पाटील, गणेश शेनफड काटे ,दत्तात्रय नारायण जाधव, रामू इंदर्सिंग राजपूत उपस्थित होते.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..

| गुंतवणूक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |



ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४